<u>वादीतर्फे श्री.एस.बी.फड वकिल यांच्यामार्फत उलटतपास शपथेवर सुरु.</u>

११. वादी यांना मुळकी येथे गट क्र.११७ मध्ये ६३ आर जमीन वाटून आली होती, याची मला माहिती नाही. ती जमीन त्यांनी अंतेश्वर भंडे यांना रुपये ४,१०,०००/- मोबदल्यास सन २०१५ साली विकली, याची मला माहिती नाही. हे खरे नाही की, वादीविरुध्द आम्ही दाखल केलेल्या फौजदारी खटल्याच्या खर्चापोटी वादीला ही जमीन विकावी लागली. वादी माझ्याविरुध्द कधीही सरपंच पद किंवा अन्य पदाच्या निवडणुकासाठी उमेदवार म्हणून उभे राहिलेले नाहीत, हे खरे आहे. वादीने माझ्याविरुध्द निवडणुकीत कधीही पॅनेल उभे केलेले नाही, याबद्दल मला आठवत नाही. वादी माझा राजकीय विरोधक नाही, हे खरे आहे. वादीने माझयाविरुध्द कधीही न्यायालयात या दाव्याशिवाय अन्य खटला केलेला नाही, यास माझे सांगणे की, चाकूर पोलीस ठाण्यात माझ्याविरुध्द गुन्हा वादीने दाखल केला आहे. तो गुन्हा काय होता, हे मला सांगता येणार नाही. वादी आणि माझ्या वयात बरेच अंतर आहे, याबद्दल मला माहिती नाही. वादी माझ्यापेक्षा वयाने ज्येष्ठ आहेत. मला समज येण्यापुर्वी वादीची कारर्कीद काय होती, याची मला माहिती असायचे कारण नाही, हे बरोबर आहे. वादी वि.का.स. सोसायटीचे चेअरमन होते, हे मला माहित नाही. त्यांच्या चेअरमन पदाच्या काळात या सोसायटीची १०० टक्के वसुली होती, याबद्दल मला माहिती नाही. वादीचा थोरला मुलगा शिक्षक होता, हे खरे आहे. वादीचा दुसरा मुलगा स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन करतो हे मला माहिती नाही. वादीचे कुंटूंब उच्चशिक्षीत व प्रतिष्ठीत आहे, हे मला माहिती नाही. माझ्यात आणि वादीत यापुर्वी आर्थीक व्यवहार झालेले नाहीत. मी वादीकडे किंवा वादीने माझ्याकडे पैसे मागितले असे कधी झाले हे मला आठवत नाही. वादीने माझ्याविरुध्द गुन्हेगारी स्वरुपाचे कृत्य केले असे झालेले नाही. आता मला नि.क्र.१४३/१ हा कागद आता मला वाचून दाखवला. सदर अर्ज मी चाकूर पोलीस ठाण्यात दिलेला नाही. (सदर कागद दाखवत असताना प्रश्न विचारण्यापुर्वी सदर सही

माझी नाही असे साक्षीदार म्हणाले. मात्र, चष्मा नसल्यामुळे आपल्याला असे नि.क्र.१४३/१ हा कागद दाखवत असताना साक्षीदार श्री. फड वकिलांना म्हणाले. त्यामुळे, साक्षीदाराचे वर्तन त्याच्या वाक्यांच्या परस्पर विरोधी आहे.) आता मला माझी कैफीयत नि.क्र.२६ दाखवली. त्यावर माझे नाव आहे. त्यावरील माझे नाव मला दिसते. त्यावरील सही मला दिसत नाही. जबाब दाव्यातील मजकुर मला माहिती आहे. कैफीयत कलम क्र.८ मधील कावळा आणि हंस यांच्या अनुषंगाने आलेल्या वाक्याचा अर्थ मला सांगता येतो. वादीचे वागणे कावळयासारखे नसून राजहंसासारखे आहे. माझ्या दृष्टीकोनातून वादी हा चारित्र्यवान व प्रतिष्ठीत आहे.

१२. नि.क्र.२६ या कैफीयतीवरची व नि.क्र.१४३/१ या कागदावरील सही माझीच आहे, हे खरे नाही. वादी माझ्याकडून प्रोसीडींग बुक देण्याच्या बदल्यात चाळीस हजारांची खंडणी मागतो म्हणून मी त्याच्याविरुध्द चाकूर पोलीस ठाण्यात सदरचा अर्ज दिला होता, हे खरे नाही. प्रतिवादी क्र.१ कडे वादीने याच कारणासाठी पंचवीस हजाराची खंडणी मागितली असा त्या अर्जात उल्लेख आहे, हे म्हणणे खरे नाही. या अर्जाची प्रत मी गटविकास अधिकारी, अहमदपूर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., लातूर व पोलीस अधिक्षक, लातूर यांना पाठवली हे खरे नाही. नि.क्र.२६ या कैफीयतवरची सही व नि.क्र.१४३/१ या अर्जावरची सही तपासणीकामी विशेषज्ञांकडे पाठविण्यासाठी माझी तयारी आहे. नि.क्र.१४३/१ या अर्जावरील सही माझी नाही, तो अर्ज मी दिलेला नाही असे माझे कथन खोटे आहे, हे म्हणणे खरे नाही.

१३. मी सरपंच असताना अरुण सुर्यवंशी उपसरपंच होते, हे खरे आहे. अरुण सुर्यवंशी व माझे राजकीय व मैत्रीचे संबंध आहेत, हे खरे नाही. आमच्या गावातील लहु लोहारे याला मी ओळखतो. लहू लोहारे याने चाकूर पोलीस ठाण्यात वादीविरुध्द खोटा फौजदारी खटला दाखल केला आहे, याबद्दल मला माहिती नाही. त्या फौजदारी खटल्यात पंचनाम्यावर पंच म्हणून माझी सही आहे, हे खरे आहे. हे खरे नाही की, वादीचे चारित्र्य हनन होईल असे सन २००५ सालापासून सतत माझे वर्तन राहिले आहे. वादीविरुध्दच्या खोटया गुन्हयात मी माझी साक्ष

दिलेली आहे, हे खरे नाही. वादीविरुध्दच्या खटल्यात खोटया पंचनाम्यावर मी सहया केल्या आहेत, हे खरे आहे. मुळकी गावालगत न्यासाकडे नोंदणी असलेले मारुती मंदीर आहे, हे खरे आहे. हे खरे की, या मंदिराला लागून गावठाणालगत मंदिराची जमीन आहे. मंदिराच्या जागेवर काही ग्रामस्थांनी गोठे, घरे अतिक्रमण करुन बांधली आहेत, याची मला माहिती नाही. त्या बांधकामाच्या नोंदी मी सरपंच असताना ग्रामपंचायत दप्तरी कुठलेही हस्तातंरन न होता घेतल्या, हे खरे नाही. मंदिराची जमीन हडप करण्यात माझा हात आहे, हे खरे नाही. सर्व प्रतिवादींनी मिळून संगनमत करुन वादीची बेअब्रु व्हावी म्हणून त्याच्याविरुध्द खंडणी मागणीचा खोटा गुन्हा दाखल केला, हे खरे नाही. माझी कैफीयत व शपथपत्र खोटे आहे, हे खरे नाही. सरतपासातील मजकुर खोटा आहे, हे खरे नाही. हे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

स्वाक्षरीत/-
(एस.एन.सरडे)
दिनांक २९/०४/२०२६. **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**